**<u>फिर्यादीतर्फे अतिरिक्त सरतपास – श्री. जे. जी. दिडबाग वकील.</u>**

६. आता मला आरोपीने दिलेला वादातील धनादेश दाखवला, त्यावरती आरोपीची स्वाक्षरी आहे. त्याला **नि. क्र.-१७** देण्यात येतो. आता मला आरोपीने दिलेला धनादेश अनादरीत झाल्याचा बँक मेमो दाखवला, त्यावरती बँक कर्मचा-याची स्वाक्षरी आणि शिक्का आहे. त्याला **नि. क्र.-१८** देण्यात येतो. आता मला आरोपीला दि.२८.०६.२०२४ रोजी पाठवलेल्या नोटीसीची मूळ प्रत दाखवली, तिला **नि. क्र.-१९** देण्यात येतो. आता मला आरोपीला सदर नोटीस पाठवल्याची आणि त्याला प्राप्त झाल्याबाबतच्या पोस्टाच्या पावत्या दाखवल्या, त्याला अनुक्रमे **नि. क्र.२० व २१** देण्यात येतात. आता मला आरोपीने माझ्या हक्कात करुन दिलेल्या करारनाम्याची मूळ प्रत दाखवली, त्यावरती त्याची स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला नि. क्र.-२२ देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे उलटतपास – श्री. डी. डी. आजगेकर वकील.</u>**

७. आरोपी व वकील हजर. उलट तपास घेण्यास नकार. सबब, उलट तपास नाही असा आदेश करण्यात येतो.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०४.०३.२०२५.　　(आर. पी. थोरे)

आजरा.　　प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा